Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# बालसाहित्याचे प्रयोजन

सचिन शं. पालवे
सहायक प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
Email - sachinpalve.77gmail.com

## शोधसारांश

साहित्याच्या कुशीत जन्म घेऊन आजपर्यंत विविध साहित्याचे प्रवाह निर्माण झालेले आहेत. या साहित्याच्या प्रवाहाची विविधांगी मार्गाने मीमांसा करून साहित्याचा विचार करण्यात आलेला आहे. बालसाहित्याचा विचार करतांना, साहित्याची निर्मितीची प्रक्रिया, साहित्यकृती, लेखक आणि वाचक या चारही घटकांच्या परस्पर संबंधाचा अन्वयार्थ लक्षात घ्यावा लागतो. लेखक साहित्याची निर्मिती का करतो? वाचक साहित्य का वाचतो? साहित्यकृतीचे स्वरूप म्हणजे काय? हे प्रश्न जेव्हा उपस्थित होतात, त्यावेळी या प्रश्नांच्या कार्यकारणभावाचा मागोवा घेत असतांना, साहित्याच्या प्रयोजनाचा विचार करणे आवश्यक ठरते. लेखकनिष्ठ, वाचकनिष्ठ, साहित्यकृतीनिष्ठ असे साहित्याच्या प्रयोजनाचे तीन स्थूल प्रकार पडतात. त्याचप्रमाणे देशकाल परिस्थितीचाही संदर्भ लक्षात घ्यावा लागतो. सारांश, बालसाहित्याच्या वाटचालीमध्ये बालसाहित्याची प्रकृती आणि प्रयोजन या संकल्पनांमध्ये बदल झालेले आपणास दिसून येतील.

**मुख्य शब्द -** साहित्य, बालसाहित्य, साहित्यविचार, प्रयोजन, लेखक, साहित्यकृती, वाचक

## प्रस्तावना

प्रयोजन या शब्दाचा अर्थ हेतू, उद्देश असा होतो. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या माणसाच्या प्राथमिक गरजा असून, त्यांच्या पूर्तीसाठी व्यवहार उपयोगी वस्तूंची निर्मिती केली जाते. या वस्तूंची निर्मिती काहीतरी प्रयोजन डोळयासमोर ठेवून निर्माण केली जाते. कोणत्याही वस्तूंच्या स्वरूपाचा त्याच्या प्रयोजनाशी घनिष्ठ संबंध असतो. अन्न, वस्त्र, निवारा, वेगवेगळया गरजा भागविण्यासाठी निर्माण झालेल्या असतात; परंतु साहित्यमात्र वेगवेगळया कारणासाठी निर्माण होते म्हणून, साहित्य कशासाठी या प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे असून तितकीच वेगवेगळी प्रयोजने सांगता येतात.

साहित्य हे मानवनिर्मित आहे, मानवाची प्रत्येक कृती सहेतुक असते. भारतीय व पाश्चिमात्य मीमांसकांनी साहित्य प्रयोजनासंदर्भात विस्तृत चर्चा केलेली आहे. विश्वाच्या अफाट पसाऱ्यात मानवी अस्तित्वाचे स्थान काय? मानवी जीवनात ललित साहित्याचे स्थान कोणते? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधतांना, जीवनविषयक नवी दृष्टी देऊन जीवनानुभूती समृद्ध करणे आणि अंतिम सत्याचा, परतत्त्वाचा साक्षात्कार घडवून आणणे हेच श्रेष्ठ साहित्याचे प्रयोजन आहे, असे प्रतिपादन करण्यापर्यंत साहित्यमीमांसकांनी आपले विचार मांडले आहेत.

भारतीय आणि पाश्चिमात्य : काव्यप्रयोजन

भरत, वामन, रुद्रट, अभिनवगुप्त, भामह या संस्कृत साहित्य परंपरेतील विचारवंतांनी साहित्य प्रयोजनाबाबत वेळोवेळी चर्चा केलेली आहे. या सर्वांच्या मतमतांतरामध्ये एकवाक्यता नाही. या सर्व मतांचा परामर्श घेऊन, मम्मट यांनी काव्यप्रकाश या ग्रंथात काव्यप्रयोजनाचा व्यापक अर्थाने विचार केला आहे. आपले काव्य

प्रयोजन त्यांनी एका सूत्रात स्पष्ट केले आहे.

काव्यं यशसे अर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।
सद्यः परनिर्वृतये कान्तासम्मिततयोपदेशयुजे॥

मम्मटाने यशप्राप्ती, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, उच्चआनंद आणि प्रेमळ उपदेश ही काव्याची सहा प्रयोजने सांगितली. प्राचीन काळी ज्या प्रकारची साहित्य निर्मिती होत होती, त्यास अनुसरून ही प्रयोजने वर्णन केली आहेत. वरीलपैकी बरीचशी प्रयोजन आज कालबाह्य आहेत, असे मानले जाते. उदा. यशप्राप्ती - जुन्या काळी काव्य लिहिणाऱ्या कवीला राजदरबारात मान दिला जात असे. आजच्या काळात हे प्रयोजन थोड्याफार प्रमाणात आहे. हे प्रयोजन लेखकनिष्ठ आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम इ. संत कवींनी यशप्राप्ती किंवा अर्थप्राप्तीसाठी काव्य लिहिले, असे म्हटले तर ते हास्यास्पद ठरेल. यामुळे हे प्रयोजन अप्रत्यक्ष गौण स्वरूपाचे प्रयोजन मानावे लागेल.

रेने वेलेक यांच्या मते, साहित्याची प्रयोजने अनेक आहेत पण; सगळ्यात महत्त्वाचे प्रयोजन म्हणजे आपल्या स्वरूपाशी इमान राखणे हेच महत्त्वाचे प्रयोजन आहे. साहित्याची वेगवेगळी रुपे असतात. साहित्य कधी काव्याच्या, कथेच्या, नाटकाच्या, कादंबरीच्या रूपात निर्माण होतात. साहित्याच्या प्रकारानुसार त्यांची प्रयोजन निश्चित केली जातात.

होरेस यांच्या मते, काव्य सुंदर आणि उपयुक्त असते, ही प्रयोजन शोधाच्या दृष्टीची एक दिशा आहे. जी वस्तू सुंदर असेल, ती उपयुक्त असेल असे नाही. रेने वेलेक यांच्या मते, सुंदर आणि उपयुक्त विशेषणे काव्याला लावली, तर गैरसमज निर्माण होतील. थोडक्यात साहित्याने आनंद द्यावा, बोध करावा, मत प्रचार करावा अशा स्वरूपाची कल्पना यातून निर्माण होते, आणि ती प्रयोजनाच्या संदर्भात आग्रहाने मांडली जाते. एखादी साहित्यकृती प्रयोजनाच्या संदर्भात यशस्वी होते तेव्हा तिच्यात सौंदर्य, आनंद आणि उपयुक्तता या गोष्टी एकजीव झालेल्या असतात. यापैकी कोणता आनंद श्रेष्ठ? कोणते सौंदर्य श्रेष्ठ? कोणती उपयुक्तता महत्त्वाची? याविषयी ठामपणे सांगणे कठीण आहे, म्हणून आनंद आणि सौंदर्य हे साहित्याचे एकमेव प्रयोजन आहे असे म्हणणे योग्य ठरेल. वा. ल. कुलकर्णी यांच्या मते, आनंद आणि जीवनानुभूती हे प्रयोजनाचे दोन घटक आहेत. उच्चतर आनंदातच सुंदर उपयुक्त जीवनांनुभूती रूपांतरित होत असते.

कलावादी आणि जीवनवादी

कलेकरिता कला आणि जीवनाकरिता कला, या दोन केंद्राभोवती पाश्चात्य देशात प्रयोजनाचा विचार करण्यात आला आहे. यालाच कलावाद आणि जीवनवाद असे म्हणतात. कलावाद्यांच्या दृष्टीने सौंदर्याचे दर्शन घडविणे हे साहित्याचे प्रयोजन आहे, तर जीवनवाद्यांचा दृष्टीने वाचकांच्या मनावर नीतीचे संस्कार करणे महत्त्वाचे मानले जाते. मॅथ्यू अर्नोल्ड यांनी जीवनवादी भूमिकेतून, जीवनाच्या चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही बाजूचे चित्रण साहित्यात असते, त्यामधून जे उदात्त मंगलमय आहे तेच साहित्याचे एकमेव प्रयोजन मानावे असे प्रतिपादन केले. साहित्यिक जीवनातील अपुरेपणामुळे अस्वस्थ होऊन ते परिपूर्ण कसे होईल या जीवनवादी भूमिकेनुसार सत्य या तत्त्वाला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. सत्य म्हणजे साहित्य असे सांगितले जाते. सत्याप्रमाणे नितीलाही जीवनवादी महत्त्व देतात. नीतिमूल्ये रुजवण्यासाठी साहित्याचा जन्म होतो तेच साहित्याचे प्रयोजन आहे असे जीवनवाद्यांना वाटते.

साहित्याची निर्मिती स्वातंत्र्य नसून नीतिसंरक्षणासाठी होते असे मानले, तर साहित्याच्या स्वातंत्र्यावर बंधने येतील आणि साहित्याचा दर्जा खालावत जाईल, अशी कलावाद्यांना भीती वाटते. या कारणास्तव कलावादी भूमिका जीवनवादी भूमिकेला विरोध करतांना दिसून येते. साहित्यातून सौंदर्याचे दर्शन घडते, सौंदर्याचा अनुभव येतो इतकेच साहित्याचे प्रयोजन आहे, असे कलावादी मानतात. त्यांच्या दृष्टीने साहित्याचे विश्व स्वातंत्र्य, स्वयंभू आणि स्वायत्त असते.

कलावाद आणि जीवनवाद या दोन्ही साहित्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनामध्ये मतभिन्नता असली तरी, त्यांच्यात परस्पर सामंजस्यही दिसून येते. कलेच्या दृष्टीने उत्तम असलेल्या साहित्यकृती वाचकांवर जीवनमूल्यांचा संस्कार करतातच. सारांश, कसे सांगितले आहे हे कलावाद्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते, तर काय सांगितले आहे हे जीवनवाद्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. म्हणून या दोन्ही भूमिकेला एकत्रित महत्त्व देणे आवश्यक ठरते. या दृष्टिकोनातूनच आत्मविष्कार, स्वप्नरंजन, विरेचन, जिज्ञासातृप्ती, प्रचार, उद्बोधन, मनोरंजन, अनुभव विश्वाची समृद्धी, साहित्याची स्वरूपनिष्ठा ही साहित्याची प्रयोजने मानली जातात.

बालसाहित्यातील प्रयोजन विचार

बालसाहित्याच्या प्रयोजनाचा विचार करीत असतांना मनोरंजन आणि उद्बोधन ही प्रयोजने महत्त्वाची मनाली जातात. मराठी साहित्यात बालकांसाठी वेगळे साहित्य असावे, हा विचार अव्वल इंग्रजी कालखंडात सुरु झाल्याचे दिसून येते. त्यापूर्वी मराठी साहित्यात महानुभाव पंथाच्या साहित्यनिर्मितीमध्ये बालसाहित्याची काही चिन्हे दिसून येतात. संत वाङ्मयातही लहान मुलांसाठी साहित्य लिहिलेले आढळून येते. संतांच्या मांदियाळीतील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, त्याचप्रमाणे मोरोपंत, मध्वमुनीश्वर यांनीही रामाच्या, कृष्णाच्या बाललीलांचे कौतुक करणाऱ्या कविता लिहिल्या आहेत.

प्राचीन संस्कृत वाङ्मयात पंचतंत्र हितोपदेश यांसारखे साहित्य बालकांसाठी लिहिलेले आहेत. हितोपदेश या ग्रंथात ग्रंथरचनेचा हेतू सांगितलेला आहे

यन्नवे भाजने लग्नः,संस्कारो नान्यथा भवेत।
कथाच्छलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते॥

ज्या कारणाने कच्च्या मातीच्या मडक्यावर केलेले नक्षी किंवा चित्ररूपी संस्कार मडके भाजून पक्के झाल्यावर बदलत नाहीत, त्याच कारणाने (बालपणी मनोरंजक रीतीने ऐकवलेले संस्कार मुले विसरत नाहीत) बालकांना इथे अनेक कथांच्या रूपात नीतिशास्त्र सांगितले जाते. पंचतंत्र, हितोपदेश या ग्रंथात नीतीचा उपदेश करणाऱ्या संस्कारित कथा दिसून येतात. राजनीती आणि व्यवहारज्ञान यांचे शिक्षण, हे पंचतंत्राचे प्रयोजन आहे.

मौखिक परंपरेतील कहाणी वाङ्मयाचे स्वरूप अद्भूत आणि मनोरंजनात्मक होते. पशुपक्ष्यांच्या व कल्पित गोष्टींचा त्यात भरणा होता. त्यांचा हेतू मात्र एखादे नीतितत्त्व सांगणे हाच दिसतो. मुलांचे भावविश्व समृद्ध व संपन्न करावे आणि त्यांना जगाच्या विशालतेची, जटिलतेची, अद्भुताची कल्पना यावी, हा उद्देश होता. लोकसाहित्यातील कहाणी वाङ्मयाबाबत सरोजिनी बाबर म्हणतात, 'कथेच्या रूपाने मुलांना बोधामृत पाजावे हा कहाणी सांगण्याचा हेतू असे आणि काहीतरी मजेदार, चटकदार भव्य-दिव्य ऐकायला मिळावे व मनाची करमणूक व्हावी, अशी ऐकणाराची भावना असे. त्यामुळे सांगणाऱ्याची कुवत आणि ऐकणाऱ्याची संस्कृती, या दोन मुख्य आधारावर अगदी पुरातन काळापासून कहाणीची जोपासना होत आली आहे.'

मुद्रित माध्यमांच्या प्रारंभी व अव्वल इंग्रजी कालखंडात, शालेय खात्याकडून प्रकाशित पुस्तकातून मुलांना गोष्टीच्या मदतीने नीतिपाठ देणे, हा महत्त्वाचा उद्देश समोर ठेऊन पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. अव्वल इंग्रजीतील एक आरंभीचे मराठी ग्रंथकार आणि भाषांतरकार. 'बापू छत्रे' 'हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी'चे नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक झाली (1823). या पदावर असताना सिंहासनबत्तिशी (1824), बाळमित्र-भाग पहिला (1828), इसाप नीतिकथा (1828) आणि वेताळपंचविशी (1830) ही पुस्तके त्यांनी लिहिली. यांशिवाय मराठी बोधवचने (आवृ. तिसरी, 1831) हे पुस्तकही त्यांच्या नावावर मोडते. त्यांचा बाळमित्र हा ग्रंथ म्हणजे एका फ्रेंच कथाग्रंथावरून तयार केलेल्या 'बर्क्विन्स चिल्ड्रन्स फ्रेंड' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद होय. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत छत्रे म्हणतात

''ह्या ग्रंथ कर्त्याने दोन गोष्टी मनात आणून हा ग्रंथ तयार केला आहे. एक तर मुलांचे रंजन आणि दुसरे म्हणजे त्यास सदगुण सहज लागावे. सांप्रत त्यांच्या (मुलांच्या) हाती जे ग्रंथ पडतात ते त्यांच्या बुद्धीत भरायास अवघड आहे. ते समजुतीस खोल, अभिरुचीस रुक्ष व उपदेशास कटू असे असल्याने मुलांच्या चित्तात वाचनाविषयी व्हावी तशी प्रीती उत्पन्न करणार नाही, ह्या ग्रंथात तसे नाही. तेथे त्यांची भाषा, त्यांचे खेळ, त्यांचे उद्योग व त्यांची अपेक्षिते ही सांगितल्यामुळे त्यास वाचता-वाचता नकळत सहज चांगले गुण लागावे, म्हणून त्यास बालमित्र हे नाव दिले.''

साने गुरुजींनी बालांसाठी आणि कुमारांसाठी केलेले लेखन ठळकपणे नजरेत भरते. 'करी मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' ही त्यांची लेखनामागची भूमिका होती. मनोरंजनाबरोबरच मुलांवर उत्तम नैतिक संस्कार व्हावेत, हेही त्यांचे उद्दिष्ट होते. मालती दांडेकर यांनी बालसाहित्याची रूपरेषा या आपल्या ग्रंथात बालमासिकांचा सविस्तर आढावा घेतला आहे. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील बालमासिकाच्या संपादकांनी बालमासिकाचा मागचा उद्देश आपल्या संपादकीयात स्पष्ट केला आहे.

1881 या वर्षी संपूर्ण मराठी वळणाचे 'बालबोध' या मासिकाचा उदय झाला. विनायक कोंडदेव ओक हे त्याचे संपादक होते. मासिक काढण्याचा त्यांचा उद्देश, पुढीलप्रमाणे व्यक्त होतो, ''शाळेत कळत नाही, पण तुम्हास कळायला पाहिजेत अशा लक्षावधी गोष्टी आहेत. तुमच्या मनाला करमणूक व्हावी, तुमच्या अंगाचे सद्गुण वाढावे यासाठी आमचा प्रयत्न आहे.'' आनंद - वासुदेव गोविंद आपटे - 1906 पहिला अंक - उद्देश, 'तुम्हाला तुमचा मार्ग दाखवावा, वाट खडे वेचून साफ करावी, अडचणीच्या जागी तुम्हांस हात द्यावा, तुमच्या मनाला आनंदवित गमतीने चार गोष्टी सांगाव्या म्हणून मी आलो आहे.'

स्वातंत्र्योत्तर काळात भा. रा. भागवत आणि लीलावती भागवत यांनी सुरु केलेले बालमित्र (1950) नियतकालिक वैशिष्ट्यपूर्ण ठरले. 'बालरंजन' हेच प्रमुख उद्दिष्ट बालमित्रचे दिसून येते. अंतरंगाबरोबर बालमित्र नियतकालिकांमध्ये भरपूर चित्रे, ठळक टाईप, आकर्षक मुखपृष्ठ, बालकांना आकर्षित करण्यासाठी उपयुक्त ठरले.

छावा मासिकाचे वेगळेपण

लोकमान्य टिळकांनी केसरी वर्तमानपत्राद्वारे लोकप्रबोधनाचे व स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकांमध्ये स्वाभिमान जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी इंदुताई टिळक यांनी केसरीबरोबर लहान मुलांसाठी बालसह्याद्री पुरवणीची सुरुवात केली. वर्तमानपत्राची काही पाने, बालकांच्या जाणीवा समृद्ध करण्यासाठी राखून ठेवली पाहिजे, असा विचार मराठी वर्तमानपत्राच्या इतिहासात 'केसरी'ने सर्वप्रथम केल्याचा दिसून येतो. बालकांसाठीचे साहित्य केवळ आनंद आणि मनोरंजन यापुरते मर्यादित न ठेवता,

मुलांमधील 'बहुआयामी बुद्धिमतेचा विकास' हा उद्देश बालसह्याद्रीचा दिसून येतो.

बालसह्याद्री पुरवणीच्या प्रेरणेतून केसरी-मराठा संस्थेने 1885 या वर्षी 'छावा' मासिकाची सुरुवात केली. डॉ. दीपक टिळक हे छावाचे पहिले संपादक होते. त्यांनी कालसुसंगतता, कृतिशीलता, उपक्रमशीलता व प्रयोगशीलतेच्या दृष्टिकोनातून, बालकांच्या भावनिक, तार्किक, सर्जनशील बुद्धिमत्तेच्या विकासासाठी चालना दिली. साहित्यातील कलामूल्ये आणि जीवनमूल्ये यांचे संतुलन हे छावाचे वैशिष्ट्य आहे, ते मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी हितकारक ठरत आहे.

## प्रयोजन आणि परिणाम

प्रयोजन आणि परिणाम या दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत. बहुतांश वेळी या संकल्पना समानार्थी मानल्या जातात. जेव्हा परिणामाची अपेक्षा ठेऊन साहित्यकृती निर्माण होते, तेव्हा साहित्याचे प्रयोजन आणि परिणाम एकच होतात, अशा साहित्याला प्रचारात्मक साहित्य मानले जाते. प्रचार हे साहित्याचे प्रयोजन मानावे की मानू नये यांच्याविषयी मतभेद आहेत. प्रचाराचे स्वरूप काहीसे उद्बोधनासारखे आहे असे मानले जाते; परंतु, बालसाहित्याच्या संदर्भात प्रयोजन आणि परिणाम हा मुद्दा गौण ठरतो. सारांश, बालसाहित्य आणि बालमानसशास्त्र यांच्यातील सहसंबंध बालसाहित्याची प्रकृती ठरविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावताना दिसून येतो. परिणामी, उद्बोधन बालसाहित्याचे प्रारंभापासून ते आजपर्यंत महत्त्वाचे प्रयोजन ठरले आहे.

बालकांमध्ये उपजत कुतूहलवृत्ती असते, बाह्यजगतातील प्रत्येक गोष्ट त्यांच्यासाठी नवी असते, ते जाणून घेण्याची तीव्र इच्छा बालकांना असते. यामुळे जिज्ञासातृप्ती हे बालसाहित्याचे प्रयोजन मानले जाते; पण, जिज्ञासा ही एक वैचारिक ज्ञानात्मक जाणीव आहे, तिची एकदा तृप्ती झाली की, ती पुन्हा अतृप्त होत नाही, (उदा. शास्त्रीय ग्रंथ) परंतु, बालसाहित्य हे पुन्हा-पुन्हा वाचले जाते, या कारणास्तव जिज्ञासातृप्ती हे प्रयोजन मर्यादित अर्थाने लक्षात घेता येईल. बालकांमध्ये असलेल्या क्रीडाप्रवृत्तीमुळे आनंद आणि मनोरंजन ही प्रयोजनं मानली जातात. आनंद, प्रयोजन लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ तर इतर वाचकनिष्ठ प्रयोजन मानता येईल.

## निष्कर्ष/सारांश

साहित्याची निर्मिती प्रक्रिया, लेखक, साहित्यकृती आणि वाचक यांचा एकत्रित विचार केल्यास, बालसाहित्याची प्रयोजने ठरविण्यात, मुख्यतः बालसाहित्याच्या वाचकवर्गाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे, परिणामी, साहित्यकृती, लेखकनिष्ठ प्रयोजनाच्या तुलनेत बालसाहित्याची, वाचकनिष्ठ साहित्य प्रयोजनं अधिक मानली जातात. कालानुरूप बालसाहित्याच्या प्रकृती आणि प्रयोजनामध्ये बदल झालेले दिसून येतात. प्रारंभी, बालकांवर शिक्षणाच्या माध्यमातून नैतिकतेचे संस्कार, मनोरंजनापासून ते ज्ञान, सामाजिक जाणीव, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील, तार्किक, भावनिक बुद्धिमत्तेचा विकास करण्यापर्यंत बालसाहित्याची प्रयोजने मानली आहेत. बालसाहित्याची प्रकृती म्हणजेच स्वरूप, आशय आणि अभिव्यक्तीमध्ये बदल झालेले आहेत. जीवनमूल्यांबरोबर कलामूल्यांचा पुरस्कार केला, तर बालसाहित्याला कृत्रिम स्वरूप प्राप्त होणार नाही, काळाच्या ओघात नैसर्गिकरित्या ते आपले नित्यनूतन स्वरूप कायम धारण करीत राहील.

सध्या सहजपणे वाचनासाठी मिळणाऱ्या माहितीच्या पसाऱ्यातून, (वाढती समाज माध्यमे आणि त्यांचा

प्रभाव ,कृत्रिम बुद्धिमत्ता) मुलांवर योग्य तो वाचन संस्कार घडविण्याच्या प्रयोजनाचे आव्हान, यापुढील काळात लेखक, शिक्षक, पालक आणि प्रकाशक यांच्यावर असणार आहे. यशप्राप्ती, व्यवहारज्ञान, अर्थप्राप्ती ही काव्य प्रयोजने प्रबळ होत असतांना लेखकाच्या बांधिलकीवर सखोल चर्चा होणे अपेक्षीत आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये देशकाल परिस्थिती सापेक्ष बालसाहित्याची प्रयोजने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बालसाहित्याच्या प्रत्येक प्रयोजनाच्या स्वरूपावर, स्वातंत्र्यपणे विस्तारित स्वरूपात आपणाला भाष्य करता येईल.

**संदर्भग्रंथ**

समीक्षा-संज्ञा ,मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2002
दडकर, जया ; गणोरकर, प्रभा,संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, जी.आर.भटकळ फाउंडेशन, मुंबई.
कुलकर्णी, अ. वा. : साहित्यविचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, 1997
दांडेकर, मालतीताई : बालसाहित्याची रूपरेखा, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई.
भागवत, लीलावती : मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप
शाह, सुलभा : मराठी बालवाङ्मय स्वरूप आणि अपेक्षा, लीलावती प्रकाशन,

कलेची मूलतत्त्वे (R. G. Collingwood च्या The Principles of Art Oxford : Clarendon Press, 1938 या ग्रंथाचे भाषांतर) भाषांतरकार : डॉ. स. गं. मालशे / मिलिंद स. मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती : डिसेंबर, 2004

साहित्य-सिद्धांत : ( रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरन लिखित 'Theory of Literature' या ग्रंथाचा अनुवाद) अनुवाद, डॉ. स. गं. मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती, 2011

काळे, प्रेमला : बालमानसशास्त्र
संपादक डॉ. उज्वला मेहेंदळे : बालसाहित्य : स्वरूप आणि व्याप्ती, ग्रंथाली प्रकाशन